**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.३ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. जी.एन.इंगळे यांच्या मार्फत सुरू–</u>**

माझे शिक्षण तिसरीपर्यंत झाले आहे. माझे उर्दू भाषेतील शिक्षण झाले नाही. वादी माझी मामी आहे. बिपाशा ही हुशेनची पत्नी आहे. हुसेन मयत झाल्याचे तारीख मला सांगता येत नाही. हुशेनचे वडील फकीरसाब सन २००५ मध्ये मयत झाले आहेत. वाद मिळकतीचा सर्वे नंबर ८३ व ८८ आहे. वाद मिळकत वडीलांची आहे किंवा कशी याची मी चौकशी केलेली नाही. मला वाद मिळकतीच्या चतुःसीमा सांगता येत नाहीत.

मला सर्वे नंबर ८८ आणि ८३ च्या चतुःसीमा माहीत नाहीत. सन २०० मध्ये कोणत्या तारखेला व महिन्यात ईद होता हे मला सांगता येत नाही. सन २००० मध्ये वाद मिळकतीमध्ये कोणते पीक घेतले होते हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी हा माझा नातेवाईक आहे म्हणून त्यांना मदत करण्याकरीता साक्ष देत आहे. दावा कशाकरीता दाखल केला आहे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी यांच्या वादाची मला माहिती नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2025.10.09 17:54:18 +0530

**(श्रीमती ए.एस.गुंजवटे)**

**दिनांकः– ०९/१०/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, निलंगा.**

**ठिकाणः– निलंगा. जिल्हा लातूर.**